REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# मतीमंद मुलांचे शिक्षण, पुनर्वसन आणि विकास : एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. कविता पी. कान्होलकर
ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना :**



योग्य व्यावसायिक मदत आणि पूरक सामाजिक वातावरण जर पालकांना मिळत गेले तरच पालक पुर्नसंक्रमण या संक्रमण अवस्थेत पोचतात. सुरूवातीला मतीमंद अपत्याविषयी निर्माण झालेल्या भावना कालांतराने क्षीण झालेल्या असतात. बरेचदा मतीमंद अपत्याला केंद्रस्थानी ठेवून जीवनचर्या घालविण्याची गरज राहते. परंतु स्वतःच्या व मतीमंद अपत्याच्या वाढत्या वयामुळे नवीन समस्या निर्माण होत राहतात. त्यावेळी भावनिक व मानसिक दृष्टया पूर्णपणे सावरलेले पालक या नव्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी तयारीने प्रयत्न करु लागतात. 'मतीमंद मूल आणि त्यांच्या पालकांचे जीवन' यात आवश्यक तसे फेरबदल घडवून ती दोन्ही जीवने जुळलेली असतात. अशावेळी या पालकांना आपले वैयक्तिक जीवन अधिक अर्थपूर्ण व समृध्द करण्याकरिता, संधी व मोकळीक देणे आवश्यक आहे

सामाजिकरित्या बघितल्यास या मुलांचा सामान्य मुलांमध्ये सहभाग होणे नितांत आवश्यक आहे. त्यासाठी शेजाऱ्यांमध्ये त्यांच्यासंबंधी थोडी माहिती देणे आवश्यक आहे. एक सारखा उपाय व दिनचर्या रोज होणे आवश्यक आहे. जेणे करुन मतीमंद मूल उत्तमरित्या प्रशिक्षित होईल. जर मुलगा पालकांच्या गोष्टी ऐकत नसल्यास त्याकरिता वर्तवणुक अडचणी संबंधीत उपाय लागू करायला पाहिजे. जसे की, थोडीशी शिक्षा किंवा बक्षीस देऊन आपले मुख्य ध्येय मुलाला कोणत्याही तऱ्हेने शिकविणे गरजेचे आहे. यासोबतच मुलांना त्यांच्या आवडीनुसार प्रोत्साहन द्यायला हवे. याकरिता त्यांचे अभिभावक शिक्षक व नातलग यांना कठीण परिश्रम, आवड आणि सहनशक्ती असणे आवश्यक आहे.

डॉ. मारिआ यांच्या मते, पालकांचा उपरोक्त विचारप्रवाह सामावून घेऊन व्यावसायिकांनी सकारात्मक पध्दतीने काम करणे आवश्यक ठरते. अपुरी माहिती असणारा पालक हे त्याच्या मतीमंद मुला/मुलींच्या दृष्टीने इतरांपेक्षा अधिक धोकादायक ठरु शकतो. आजच्या पालकांचे सतत वाढणारे प्रश्न आणि चिंता यांचा विचार केल्यास कोणतेही ठराविक एक काम पुरेसे नाही. हे पालक भिन्न भिन्न पातळीवरचे असतात. सुशिक्षित, अशिक्षित, दूरवरच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात राहणारे आणि शहरात राहणारे. चिंता व्यक्त करण्याच्या पध्दती जरी वेगळया दिसल्या तरी त्यांच्या शंका मात्र सारख्याच असतात. या पालकांबरोबर त्यांच्या चिंतानुसार बोलले पाहिजे आणि त्यांना चिंतामुक्त होण्याची क्षमता प्राप्त करुन दिली पाहिजे. ती क्षमता प्राप्त करुन देण्याकरिता आपण त्यांना जाणीव करुन देणारे साहित्य उपलब्ध करुन दिले पाहिजे.

देशात मतीमंद मुलांना सामाजिक स्थान मिळवून देण्याकरिता काही शासकीय संस्थामार्फत कार्य केले जाते. तसेच या समस्येची तीव्रता कमी करण्याकरिता शासनाव्दारे अनेक योजना राबविण्यात येतात. बरेचदा समाजाकडून मतीमंद मूल असणाऱ्या पालकांची अवहेलना होते. अशावेळी पालकांच्या मानसिक भावना दुखावल्या जातात. बरेचदा अशा पाल्यांना आवश्यकतेपेक्षा जास्त सहानुभूतीही मिळते. अवहेलना अथवा सहानुभूतीची गरज समाजाकडून पालकांना नसते. तर ज्याप्रमाणे मतीमंद मूल एक कुटुंबाचा घटक असतो तसाच तो अन्य सामान्यांप्रमाणे समाजाचाही एक घटक आहे. हे समाजाने मान्य करावयास हवे. तसेच शैक्षणिक संस्थामधून मतीमंद मुलांना त्यांच्या बुध्दीगुणांकाप्रमाणे योग्य व्यावसायिक शिक्षण द्यावयास हवे. त्यामुळे हा पाल्य कमीत कमी

स्वतःच्या पायावर उभा राहून पालकांच्या मागेही आपला उदरनिर्वाह करु शकतो. शासनामार्फत मतीमंद मुलांना अनेक विभागात सवलतीही देण्यात आल्यात. परंतु त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने त्यांना पेन्शन योजना, विमायोजना, व्यवसायाची सोय इत्यादी योजना अमलात आणल्यास, मतीमंद अपत्यांचे व त्यांच्या पालकांचेही जीवन सुकर होण्यास मदत होईल. याकरिता स्वयंसेवी संस्थांकडून ट्रेनिंग कोर्सेस, प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा सहभाग, शासनाच्या कल्याणकारी योजना राबविणे इत्यादी आवश्यक आहे.

प्रस्तुत शोध निबंधाद्वारे या मतीमंद मुलांचा शैक्षणिक विकास आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पालक, समाज, शासन आणि अशासकीय संस्थांची काय भूमिका आहे याबाबतचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

- **अध्ययनाचे उद्देश : (Objectives of the Study)**

1. मतीमंद मुलांना शाळेतून मिळणाऱ्या शालेय शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाची उपयोगीता अभ्यासणे.
2. मतीमंद व्यक्तिच्या विकासाकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थांच्या माहितीचे स्त्रोत पालकांच्या दृष्टिकोनातून जाणून घेणे.
3. मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेविषयी पालकांच्या मतांचे अध्ययन करणे.

- **अध्ययन पध्दती : (Methodology)**

नागपूर जिल्हयाअंतर्गत येणाऱ्या मतीमंद मुलांचे पालक हे अध्ययनाचे समग्र आहेत. प्रस्तुत अध्ययनासाठी नागपूर जिल्हयातील 14 तालुक्या अंतर्गत येणाऱ्या एकूण 66 विशेष शाळा व कार्यशाळांची निवड करण्यात आली. एकूण 66 शाळांमधील 200 विद्यार्थ्यांचे पालक उत्तरदाते म्हणून अध्ययनाकरिता निवडण्यात आले. यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून नमुन्याची निवड करतांना सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling) पद्धतीचा अवलंब करण्यात आला. प्रत्यक्ष अध्ययन करतांना प्राथमिक तथ्य (Primary Data) आणि व्दितीयक तथ्य (Secondary Data) या दोन्ही तथ्य संकलन साधनांचा अवलंब करण्यात आला. मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने प्राथमिक तथ्य संकलन करण्यात आले तर व्दितीयक तथ्य संकलनात लेख, मासिके, पुस्तके, इंटरनेट, शासकीय व गैरशासकीय अहवाल इत्यादी साधंनाचा उपयोग करण्यात आला.

- **शिक्षणाचा उपयोग :**

प्रस्तुत सारणीमध्ये मतीमंद मुलांना शाळेतून मिळणाऱ्या व्यावसायिक शिक्षणात शालेय शिक्षणाचा उपयोग होतो, या विषयी अध्ययन करण्यात आलेले आहे. याबाबत श्रीकांत चोरघडे म्हणतात, मूल अभ्यासात प्रगती करीत नसेल तर मुलातील इतर क्षमतांच्या मदतीने त्याला व्यावसायिक शि़क्षण दिले पाहीजे.

**सारणी 1**
**शालेय शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण**

| अ.क्र. | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| | शिक्षणाचा उपयोग | वारंवारिता | टक्केवारी |
| 1 | होय | 078 | 39.0 |
| 2 | थोडा फार | 122 | 61.0 |
| एकूण | | 200 | 100.0 |

उपरोक्त सारणीनुसार, मुलांना शाळेतून मिळणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणात शालेय शिक्षणाचा उपयोग होतो असे म्हणणारे पालक 78 (39.0%) आहेत, तर थोडा फार उपयोग होतो म्हणणारे पालक 122 (61.0%) आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, सर्वाधिक 122 (61.0%) पालक शाळेतून मिळणा—या व्यावसायिक प्रशिक्षणात थोडाफार उपयोग होतो असे म्हणतात. तर त्यापेक्षा कमी 78(39.0%) पालक उपयोग होतो असे म्हणतात.

- **संस्थांची माहिती :**

प्रस्तुत सारणी अंतर्गत मतीमंद व्यक्तीच्या विकासाकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थाच्या माहितीविषयी आढावा घेण्यात आला आहे. मतीमंद मुलांकरिता सर्वसामान्य शाळा नसून त्यांच्या बौद्धीक क्षमतेनुसार त्यांच्यासाठी विशेष शाळा काढण्यात आल्या आहेत. आज देशामध्ये पुष्कळशा संस्था मंदबुद्धी मुलांच्या सेवेत कार्यरत आहेत. परंतु याची माहिती या पालकांना कुणाकडून प्राप्त झाली याची माहिती घेण्यात आली आहे.

**सारणी 2**

**मतीमंद व्यक्तिच्या विकासाकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थांच्या माहितीचे स्त्रोत**

| अ.क्र. | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| | कार्यरत असणाऱ्या संस्थांची माहिती | वारंवारिता | टक्केवारी |
| 1 | शेजारी | 20 | 10.0 |
| 2 | नातेवाईक | 10 | 05.0 |
| 3 | सामाजिक कार्यकर्ता | 66 | 33.0 |
| 4 | डॉक्टर | 20 | 10.0 |
| 5 | प्रसार माध्यम (वर्तमानपत्र, टी.व्ही.) | 51 | 25.5 |
| 6 | लागू नाही | 33 | 16.5 |
| | एकूण | 200 | 100.0 |

उपरोक्त सारणीनुसार, 20 (10.0%) पालकांना मतीमंद व्यक्तिच्या विकासाकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थांची माहिती शेजाऱ्यांकडून मिळाली. 10 (5.0%) पालकांना संस्थांची माहिती नातेवाईकांकडून मिळाली.66(33.0%) पालकांना सामाजिक कार्यकर्त्यांनी व 20 (10.0%) पालकांना डॉक्टरांकडून माहिती मिळाली. 51 (25.5%) पालकांनाप्रसार माध्यमे (वर्तमानपत्र, टि.व्ही) मार्फत माहिती उपलब्ध झाली. तर 33 (16.5%) पालकांना याबाबत काहीच माहिती नसल्याने हा प्रश्न लागू नाही.

यावरून असे स्पष्ट होते की, सर्वात अधिक 66 (33.0%) पालकांना सामाजिक कार्यकर्त्यांकडून संस्थेची माहिती प्राप्त झाली. तर सर्वात कमी 10 (5.0%) पालकांना नातेवाईकांकडून माहिती प्राप्त झाली.

- **पुनर्वसनाची प्रक्रिया :**

प्रस्तुत सारणी अंतर्गत मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाची सुरू होणारी प्रक्रिया यावर पालकांचे मतांचा आढावा घेण्यात आला. मूल जरी मतीमंद असले तरी ते समाजाचा एक घटक आहे. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन होणेही तेवढेच गरजेचे आहे.

**सारणी 3**

**मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेविषयी पालकांचे मत**

| अ.क्र. | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| | पुनर्वसनाची पक्रिया | वारंवारिता | टक्केवारी |
| 1 | घरातून | 124 | 62.0 |
| 2 | समाजातून | 011 | 05.5 |
| 3 | शाळेतून | 065 | 32.5 |
| | एकूण | 200 | 100.0 |

उपरोक्त सारणीच्या अनुषंगाने, 124 (62.0%) पालकांच्या मते मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया घरातून सुरू होते.11 (5.5%) पालकांच्या मते ही प्रक्रिया समाजातून सुरू होते तर 65 (32.5%) पालकांच्या मते ही प्रक्रिया 65 (32.5%) शाळेतून सुरू होते.

यानुसार असे स्पष्ट होते की, सर्वाधिक 124 (62.0%) पालकांच्या मते मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया घरातून व न्यूनतम 11 (5.5%) पालकांच्या मते मुलांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया समाजातून सुरू होते.

- **रोजगारास मदत :**

प्रस्तुत सारणीत आपण एखादया मतीमंद व्यक्तिला रोजगार मिळवून देण्यास केलेली मदत यावर पालकांचे मत अभ्यासण्यात आले आहे. केवळ स्वतःच्या मुलांच्या विकासापुरता विचार न करता सर्व मुलांचा विकास कसा साधता येईल या विषयी मंथन करणे गरजेचे आहे.

**सारणी 4**

**मतीमंद व्यक्तीला रोजगार मिळवून देण्यास केलेली मदत**

| अ.क्र. | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| | **रोजगारास मदत** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
| 1 | होय | 116 | 57.1 |
| 2 | नाही | 063 | 31.5 |
| 3 | सांगता येत नाही | 021 | 10.5 |
| | एकूण | 200 | 100.0 |

वरील सारणीच्या अनुषंगाने, 116 (57.1%) पालकांनी इतर मतीमंद व्यक्तींना रोजगाराबाबत मदत केली. 63 (31.5%) पालकांनी याबाबत मदत केलेली नाही. तसेच 21 (10.5%) पालक या विषयी सांगता येत नाही असे मत मांडतात.

यावरून असे स्पष्ट होते की, बहुतांश 116 (57.1%) पालकांनी इतर मतीमंद व्यक्तींना रोजगार मिळवून देण्यास मदत केली तर न्यूनतम 21 (10.5%) पालक याबाबत काहीच सांगू शकत नाहीत.

- **पालकांचा दृष्टिकोन :**

खालील सारणीमध्ये शैक्षणिक विकासात्मक योजनांच्या संदर्भात पालकांचा मतीमंद विद्यार्थ्यांच्या शाळेप्रती/शासनाप्रती असलेला दृष्टीकोनाविषयी पालकांचे मत अभ्यासण्यात आलेले आहे.

**सारणी 5**

**शैक्षणिक विकासात्मक योजनांसंदर्भात पालकांचा दृष्टिकोन**

| अ.क्र. | 1 | 2 | 3 |
|---|---|---|---|
| | **पालकांचा दृष्टिकोन** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
| 1 | चंगला | 037 | 13.5 |
| 2 | साधारण | 163 | 81.5 |
| | एकूण | 200 | 100.0 |

उपरोक्त सारणीनुसार, 37 (13.5%) पालकांचा शैक्षणिक विकासात्मक योजनांच्या संदर्भात शाळेप्रती/शासनाप्रती चांगला दृष्टिकोन आहे तर 163 (81.5%) पालकांचा दृष्टीकोन साधारण आहे.

यावरून असे आढळून येते की, बहुतांश 163 (81.5%) पालकांचा शैक्षणिक विकासात्मक योजनांच्या संदर्भात शाळेप्रती / शासनाप्रती असलेला दृष्टिकोन साधारण आहे. तर न्यूनतम 37 (13.5%) पालकांचा दृष्टिकोन चांगला आहे.

## सारांश, निष्कर्ष व उपाययोजना :

बहुतांश 61 टक्के पालक शालेय शिक्षणाचा उपयोग व्यावसायिक प्रशिक्षणात थोडाफार होतो म्हणतात. कारण Samuel (1963) यांच्या मते, विशेष शाळेत पूर्व व्यावसायिक शिक्षण दिले जाते. यात मुलांची आवड व क्षमता पाहून त्याला एखाद्या व्यवसायात काही अंशी स्वावलंबी बनविता येते. त्यामुळे मतीमंद मूल पालकांच्या व समाजाच्या मदतीने व्यवसाय करून आत्मनिर्भर होऊ शकते. तसेच लहान गावात विशेष शाळा किंवा व्यवसाय केंद्र नसल्याने पालकांना घरीच त्यांच्यासाठी स्वतःचा वेळ व पैसा खर्च करून व्यवसाय सुरू करावा लागतो. बहुतांश 55.5 टक्के पालकांना सामाजिक कार्यकर्त्यांकडून व प्रसार माध्यम (वर्तमानपत्र, टी.व्ही.) व्दारे माहिती मिळाली. ज्याप्रमाणे मतिमंदत्वाचे निदान हे बहुतांश डॉक्टरांकडून कळते. त्याप्रमाणे मतीमंद व्यक्तिच्या विकासाकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थाची माहिती सामाजिक कार्यकर्ता व वर्तमानपत्रातून, टी.व्ही, व्दारे प्राप्त झाली. यावरून, बहुतांशी उत्तरदाते आपल्या मतीमंद पाल्याविषयी जागृक असले तरी योजनांची अमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने शासनाप्रती नाराज आहेत. सर्वाधिक 124 (62.0%) पालकांच्या मते पुनर्वसनाची प्रक्रिया घरातून सुरू होते. कारण Dr. Maria (1965) यांच्या मते, प्रत्येक मतीमंद मुलांमध्ये कोणते गुण चांगले आहेत आणि कोणत्या गुणांची कमतरता आहे हे लक्षपूर्वक बघणे ही पालक आणि शिक्षक दोघांची जबाबदारी आहे. या मुलांना उत्तमरित्या शिकविले जाऊ शकते. परंतु यांच्या पुनर्वसनाची मुख्यतः प्रक्रिया घरातून सुरू होते. मुलांची आई त्यांची सर्वोत्तम शिक्षक असते. ही बाब मुलांच्या वडिलांनाही लागू होते. त्यामुळेच प्रस्तुत सारणीत बहुतांश पालक पुनर्वसनाची प्रक्रिया घरातून व शाळेतून सुरु होते असे मत मांडतात.

सर्वाधिक 57.1 टक्के पालकांनी इतर मतीमंद व्यक्तींना रोजगार मिळविण्यास मदत केली. कारण FWMR (1965)यांच्या मते, मतीमंद व्यक्तींना शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याचे अखेरचे ध्येय म्हणजे त्यांच्या जीवनात सामाजिक व व्यवसायिक समायोजन करणे हे होय. याकरिता 1965 ते 1985 या काळात लोकांत जनजागृतीचे कार्यक्रम एफ.डब्ल्यू. एम.आर. इंडिया मार्फत घेतले गेले. त्यामुळेच पालकांमध्ये जनजागृती होऊन त्यांनी इतर मतीमंद मुलांकरिता केलेली उपरोक्त मदत याचेच द्योतक आहे. बहुतांश 81.5 टक्के पालकांचा शाळेप्रती/शासनाप्रतीचा दृष्टीकोन साधारण आहे. कारण विठाळकर (1999) यांच्या मते, सर्व प्रकारच्या अपंगाप्रमाणे मतिमंदांना शासनाकडून फार कमी सवलती मिळतात व ज्या आहेत त्याचा फायदा अज्ञानामुळे विशेषतः लहान गांवातील पालक घेऊ शकत नाहीत. आतापर्यंत शासनाने अपंग व मतिमंदासाठी केलेले कायदे अजूनही कार्यान्वीत झालेले नाहीत.

मतिमंदत्व ही एक समस्या आहेच. परंतु त्यांच्या कुटुंबियांच्या अनेक समस्या आहेत. त्यासाठी या समस्येतून या मुलांची किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या, पालकांच्या समस्येची तीव्रता कमी करण्याकरिता निश्चितच काही उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरेल. या समस्येच्या निराकरणाकरिता कोणते उपाय अंमलात आणणे योग्य राहतील की, जेणेकरुन या मुलांचे व पालकांचे प्रश्न सोडविणे शक्य होईल. याबाबत संशोधनाच्या निष्कर्षावरुन पुढीलप्रमाणे उपाय सुचविण्याचा प्रामाणिकपणे केलेला प्रयत्न आहे.

- मतिमंदत्व हा आजार नाही, तर हा विकार आहे. त्यामुळे मतिमंदत्वाकरिता वैद्यकीय अथवा इतर तांत्रिक उपचार न करता यांना दैनंदिन व्यवहारातील शिक्षण देऊन त्यांच्यात बऱ्याच प्रमाणात सुधारणा करता येऊ शकते.
- मतीमंद मुलांना योग्य प्रशिक्षणाव्दारे काही अंशी आत्मनिर्भर करता येऊ शकते. त्यांना छोटया—छोटया वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले जावे. तसेच त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचा उपक्रमही राबविला जाऊ शकतो. हा उपक्रम शासन अथवा मतीमंद मुलांच्या कल्याणकारी संस्थामार्फत राबविला जावा.

- बौध्दीक दृष्टया कमकुवत या मुलांना पालकांनी तिरस्कारयुक्त अथवा दयेची वागणूक देऊ नये.या मुलांचा बुध्यांक कमी असला तरी त्यांच्या अंगी असणारे सुप्त गुणांना जाणून पालकांनी व शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहीत करावे.
- समाजाने त्यांना सहानुभूती न देता, या मुलांना परावलंबनाच्या जाळयात न अडकविता, त्यांना स्वावलंबी करावे. अशा मुलांना स्वावलंबी करण्यास सर्वात महत्वाची भूमिका पालकांसोबत शिक्षकांची देखील आहे. त्यांनी या मुलांना योग्य व सुलभ मार्गदर्शन करावे.
- विशेष शाळांनी विशिष्ट उद्देश सफल करण्याकरिता प्रयत्नशील असावे.
- समाजकल्याण/राज्य शासनामार्फत मतीमंद मुलांकरिता व त्यांच्या पालकांकरिता असणाऱ्या योजनांमध्ये आणखी भर घालावी.
- केंद्र शासनाव्दारे मतीमंद मुले व त्यांच्या पालकांकरिता विकासात्मक कार्यक्रम राबविण्यात यावेत
- सामाजिक कार्यकर्त्यांनी व स्वयंसेवी संस्थांनी संशोधनाच्या माध्यमातून समाजातील सर्व नागरिकांमध्ये मतिमंदत्वाविषयी जागृकता निर्माण करण्यास प्रयत्नशील असावे.
- या मुलांकरिता असणाऱ्या योजनांची माहिती व त्याची अंमलबजावणी प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोचविण्याकरिता सक्षम यंत्रणा असावी. प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे अधिकाऱ्यांनी, योजना योग्य प्रकारे राबविणे, त्याचा प्रचार–प्रसार करणे, ग्रामीण भागात ग्रामपंचायती मार्फत योजना फलक लावणे, इत्यादी बाबत प्रयत्नशील असावे. जेणे करुन याचा लाभ अशिक्षित, दारिद्रय रेषेखालील कुटुंबीय व ग्रामीण नागरिक (लाभार्थी घटक) घेऊ शकतील.

## संदर्भ :


- Allen J., Edwards and Daceps cannel Educational psychology, n.d.
- Arieti S.B., Nature of Neurotic proce Book of Psychiatry, Vol III, New Yark ; 1974.
- Batchelor Ivor R.C.E.D., Andreson and Gillespies, Text Book of Psychiatry London, 1975.
- Bastos OM, Deslandes, Raising Children with mental disabilities, mother's narratives, Cad Saude Publication, 2008 Sep; 24.
- Benjamin B., Wolman, International encyclopedia of Psychiatry, Psychology ; 1965.
- Behavioural Approach in Teaching Mentally Retarded Children, A manual for Teacher.
- Behavioural Assessment scales for Indian Children with mental Retardation, Basic-M.R.
- Bryman A., Social Research methods, 2nd edition, Oxford University Press; 2004.
- Cook and Cook, A sociological Approach to Education, Tata MC grow Hill, C; 1960.
- Collemon J.C., Abnormal Psychology and Modern life, Bombay; 1970.
- Cliff Cunningham and Patricia Sloper, Helping Your Handicapped Baby, London; 1978.
- Child Health Projects for mentally Retarded Children the role of social worker, n.d.
- Eisenberg L., Baker B.L., Bleacher J., Siblings of children with mental retardation living at home or in residential placement, child Psycho Psychiatra, Mar; 1998.
- Foster J.J., Data Analysis Using Research SPSS for windows, A Beginner's Guide, New Delhi,-Sage publication; 1998.
- Gol Scheme to promote Voluntary Actions for persons with Disabilities, National Institute for mentally Handicapped, Vol. 2, June; 1999.
- Handbook for the trainers of the mentally retarded persons for primary level, n.d.
- Jakson P.W., Creativity and intelligence, explorations with Gifted Students, New York; 1962.
- Jaynti Narayan and A.T. Tressia kutty, Handbook for Trainess of the mentally Retarded person, NIMH, Sikandarabad; 1989.
- जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोष–खंड ११ए महाराष्ट्र राज्य साहित्य निर्मिती मंडळ, पुणे ; १९९५
- डॉ. कतरणी स्फूर्ती, मानसशास्त्र विचारविषय आणि उपयोजन, श्री साईनाथ प्रकाशन; २०००.

- Karavalamban,National Institute for mentally handicapped, Sikandarabad, Vol. 13, 2000, 1999, 1998, 1996
- Kasari C., et., al., parental perspectives on inclusion, effects of autism and down syndrome, J autism Dev Disord ; 1999.
- Katz G., Lazcano ponce E., Sexuality in subjects with intellectual disability, an educational intervention proposal for parents and counselors in developing countries, Salud Publica Mex ; 2008.
- Khamis V. Psychological distress among parents of children with mental retardation in the United Arab Emirates, Soc Sci Med ; 2007.
- Louise Prochi Shoemalker, parent and family life education, children bureau publication Washington ; 1965.
- Mental Retardetion Activities ; Jan. 1968, 1969.
- Mental Handicapped Nursing and Care, n. d.
- Neuman W. L., Social research methods, qualitative quantitative and approaches, III Ed., Boston ; 1997.
- Neisworth John, The exceptional child, A fundamental Approach, New York ; 1975.
- Niederhofer H., Educational practices in families with children suffering from borderline disorders and healthy volunteers in comparison, psychiatr Danub ; Dec. 2005.
- Narayan J., Bruce S. M., Perception of teachers and parents on the congnitive functioning of children with severe mental disability and children with congenital deafblidness, 1979
- राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्थान भारत सरकार सोसायटी वा वार्षिक रिपोर्ट, १४ वा वार्षिक रिपोर्ट, सिकंदराबाद १९९४–१९९५, १९९७–१९९८.





**डॉ. कविता पी. कान्होलकर**
**ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर.**